**प्रेस नोट** **१५/०९/२०२३**

**‘‘ एमआयडीसी पोलीस ठाणे सन २०२२ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत हरविलेले १०७ मोबाईलचा शोध घेऊन ते तक्रारदार यांना परत दिलेबाबत.’’**

एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई येथे नागरीकांनी सन २०२२ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत मोबाईल हरविलेबाबतच्या तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. नागरीकांच्या तक्रारींची दखल घेवून एमआयडीसी पोलीस ठाणेकडुन हरविलेल्या मोबाईलचा शोध घेण्यात आला.

सदरचे मोबाईल हे महाराष्ट्रातील इतर जिल्हयांत तसेच कर्नाटक, उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, झारखंड, कोलकत्ता, कर्नाटक अशा बाहेरील राज्यातून मागील काही महिन्यापासून सातत्याने प्रयत्न करुन हरविलेले विविध कंपन्यांचे एकुण १०७ मोबाईल फोन किं.अं. २४,००,०००/- रू. (चोवीस लाख रूपये ) किंमतीचा मुद्देमाल एमआयडीसी पोलीस ठाणेकडुन शोध घेवुन तो तक्रारदार यांना सुर्पुद करण्याची कामगिरी बजावली आहे.

**परत करण्यात आलेला मुद्देमाल**
**विविध कंपन्यांचे एकूण १०७ मोबाईल फोन एकुण अंदाजे किं.२४,००,०००/-रूपये**

सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री.सत्य नारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग श्री.परमजित सिंह दहिया, मा. पोलीस उप आयुक्त श्री. दत्ता नलावडे, परिमंडळ १०, मुंबई, यांचे मार्गदर्शनाखाली मा.सहायक पोलीस आयुक्त, डॉ. शशिकांत भोसले, अंधेरी विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतिश गायकवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. कोयंडे यांचे सुचनेप्रमाणे पोउपनि कृष्णा खोत, पो.ह.क्र.९७०१७३ सावंत, पो.ह.क्र.०४०२१७ नौगण, पो.शि.क्र.०८०६४१ खेमनार, पो.शि.क्र. ०७०५९२ पवार, (तांत्रिक मदत पो.ह.क्र. ०६०६९०/पिसाळ) यांनी पार पाडली.